**नि.क्र.०१ वर आदेश** (१) संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक **३६/२०१८**
सौ. सविता ओव्हाळ वि. गंगाराम मोहिते + ८

फौ. प्र. सं. १९७३ चे क. २०४ अन्वये फिर्याद निशाणी क्रमांक १ वर आदेश

(पारीत केल्याचा दिनांक **०७.०७.२०१८** )

(सी.एन्.आर.क्रमांक:एम्.एच्.आर.जी.०९०००० ५६२०१८)

**०१.** फिर्यादपत्रक, फिर्यादीची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०० ची तपासणी विचारात घेतली. फिर्यादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. बी. सावंत यांचा युक्तीवाद ऐकला.

**०२.** फिर्यादीपत्रक व फिर्यादीच्या शपथेवर नोंदवलेल्या पडताळणीवरून प्रथमदर्शनी आरोपी क्रमांक ०१ ते ०९ यांनी समान उद्देशाच्या पुरसरणार्थ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, ३५२, ५०४, ५०६ सह वाचनीय कलम ३४ अन्वये दंडनीय अपराध केल्याचे दिसते. म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १९०(१)(अ) नुसार अपराधाची दखल घ ेण्यात येते. आरोपींविरूद्ध आदेशिका जारी करण्यास पुरेसे कारण आहे अशी माझी धारणा झाली आहे. म्हणून खालील आदेश पारीत करणे न्यायाचे होईल.

**आ दे श**

(अ) आरोपींविरूद्ध फौ. प्र. सं., १९७३ चे कलम २०४ अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, ३५२, ५०४, ५०६ सह वाचनीय कलम ३४ अन्वये दंडनीय अपराधासाठी आदेशिका जारी करण्यात येते.

(आ) फिर्यादीने आरोपींना देण्यासाठी फिर्याद पत्रकाच्या प्रती दिल्यावर आरोपींना न्यायालयात हजर राहण्यासाठी समन्स काढावे.

**---स्वाक्षरी---**

**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा.**
**जिल्हा रायगड.**

**स्थळ : रोहा.**
**दिनांक : ०७.०७.२०१८.**